


WWJMRD 2018; 4(10): 59-61
www.wwjmrd.com
*International Journal*
*Peer Reviewed Journal*
*Refereed Journal*
*Indexed Journal*
*Impact Factor MJIF: 4.25*
E-ISSN: 2454-6615

**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

# ''ख्रिस्ती धर्माबद्दल असलेले गैरसमज'': - (भाग-१)

## विश्वास गोरखनाथ वळवी

**Abstract**
Christianity is a religion based on Christ and his teachings, and its basic purpose is to preach the Great Commandment preached by Christ. The missionary movement spread throughout the world from the seventeenth century onwards. In India, the Charter Act of 1811 gave momentum to that movement. The caste system and social system in India was also complex and therefore Christianity is a foreign or European religion. Such an understanding was made. India was ruled by the British for many years. Some people misunderstand that the British are Christian missionaries. But the British were different and Christian missionaries were different. The East India Company's policy was to empower the lower castes by bringing physical imperialism and health, education and financial empowerment to Christian missionaries. The concept of nation was not born. But now every nation is a sovereign nation and India is also included in the sovereign nation. Therefore, conversion does not lead to nation or emigration. Now people of every caste-religion are equal as Indian citizens.

**Keywords:** Christianity, Religion, Missionaries, Christ, Indian Christian, Conversion, Nation, Imperialism, Reforms

### १. प्रस्तावना:

ख्रिस्ती धर्म हा ख्रिस्त आणि त्याच्या शिकवणीवर उभा असलेला धर्म आहे आणि त्याचा मूळ उद्देश ख्रिस्ताने सांगितलेला महान आदेश प्रचारित करणे हा आहे. मिशनरी चळवळ सतराव्या शतकापासून संपूर्ण जगात फोफावली. भारतात १८११ च्या चार्टर कायद्याने त्या चळवळीला गती प्राप्त झाली. भारतात जातीसंस्था आणि समाजसंस्थाहि जटील होती आणि त्यामुळे ख्रिस्ती धर्म म्हणजे परकीय अथवा युरोपीय धर्म आहे. असा समज निर्माण झाला. धर्मांतरित लोकांना जातबाह्य अथवा समाजबाह्य टाकण्यात येत असे. पण हे सर्व प्रकाराने सांस्कृतिक आणि परंपरेवर प्रहार करण्यामुळे होत असे. सुरुवातीला ख्रिस्ती मिशनरी यांनी केशवपन, सतीप्रथा बालविवाह या अनिष्ठ प्रथेवर कडाडून टीका केली आणि जीवन जगण्याची सर्वोत्तम शैली ख्रिस्ती धर्मात आहे. हे दाखविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे हिंदू धर्म आणि ख्रिस्ती धर्म यात भेद दिसून आला. ख्रिस्ती मिशनरिनी आपल्या मानवतावादी धोरणांनी आणि ख्रिस्ताच्या प्रीतीने अनेक लोकांची मन जिंकली आहे. तरी ख्रिस्ती धर्माबद्दल आजही अनेक लोक काही गैरसमज घेवून चालत आहे.

### २. ब्रिटीश आणि ख्रिस्ती मिशनरी यांना समजण्यात गल्लत :

भारतात ब्रिटीशांनी अनेक वर्षे राज्य केले. काही लोकांचा गैरसमाज आहे कि, ब्रिटीश म्हणजे ख्रिस्ती मिशनरी. पण ब्रिटीश वेगळे होते आणि ख्रिस्ती मिशनरी वेगळे होते. १८१३ च्या चार्टर कायद्याने खऱ्या अर्थाने ख्रिस्ती मिशनऱ्यांना भारतात शिक्षण, आरोग्य यांच्या माध्यमातून प्रवेश मिळाला. त्याअगोदर २१३ वर्षे ब्रिटीशांनी ख्रिती मिशनऱ्यांना भारतात येण्यास नकार दिला. जर मिशनरी भारतात आले तर लोक शिक्षित होतील आणि आपल्याविरुद्ध बंड करतील, आपली आर्थिक पिळवणूक आणि नीती निष्फळ होईल. यया गोष्टीची भीती ब्रीटीशाना होती. त्यामुळे त्यांनी भारतात ख्रिस्ती मिशनऱ्यांना येण्यास मनाई केली. उदा. "१७९२ ला चार्ल्स ग्राहम एक निबंध लिहून भारतातल्या अनिष्ठ रूढीबद्दल ब्रिटीश जनतेला माहिती दिली होती. म्हाताऱ्यांना व आजारी मुलांना उघड्यावर मृत्यूची वाट बघायला सोडून देणे, महारोग्यांना जाळून टाकणे, सतीप्रथा अशा अनेक रूढीबरोबर शिक्षणाचा अभाव, दारिद्र्य या सामाजिक परिस्थितीकडे लक्ष वेधले होते. चार्ल्स ग्रांट हा बंगालचा इस्ट इंडिया कंपनीचा एक बोर्ड मेंबर होता. त्यात लॉर्ड कोर्नवालीसबरोबर माल्डाच्या रेशीम व्यापारातून प्रचंड नफा मिळविला होता.

**Correspondence:**
**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

पण जेव्हा त्यांची दोन मूल देवीने मृत्यू पावली होती. त्यांचे हृदयपरिवर्तन होऊन तो ख्रिस्ताबरोबर चालायला लागला होता. चार्ल्स ग्राहमच आव्हान होत. ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटीश एम्पायरच्या भारतीय समाजासाठी वरदान ठरवील पण चार्ल्स ग्रांट सारख्याला सुद्धा ब्रिटीश सरकारने थारा दिली नव्हती. ब्रिटीश मिशनरी पाठवायचाच जिथे विरोध होता. तिथे आर्थिक मदत सरकार करेल, हे शक्यच नव्हते. पार्लमेंटमध्ये काही पाठपुरावा शक्य नव्हता. बाप्तीस्टाना ब्रिटीश पार्लमेंटची निवडणूक लढवायला बंदी होती."[१]

ब्रिटीश आणि मिशनरी यांचा एकमेकांना विरोध दोनशे वर्षे चालला. ईस्ट इंडिया कंपनीचे धोरण हे भौतिक साम्राज्यवादी तर ख्रिस्ती मिशनर्यांचे आरोग्य, शिक्षण, आर्थिक सबळता आणून तळागाळातील समाजाला बळ देणे हा होता.

| | ब्रिटीश सत्ताधारी | ख्रिस्ती मिशनरी |
|---|---|---|
| १ | आर्थिक पिळवणूक करणे | तळागाळातील समाजाला सबळता प्रदान करणे |
| २ | भौतिक साम्राज्यवादी धोरण | आध्यात्मिक साम्राज्यवाद |
| ३ | ब्रिटीश पार्लमेंटच्या अधीन | ख्रिस्त आणि बायबल प्रथम |
| ४ | तोडा व फोडा नीतीचा वापर | शिक्षण व आरोग्याच्या माध्यमातून समाज सुधारणा |
| ५ | भारतात भौतिक प्रगतीच्या माध्यमातून भौतिक संपत्ती लुटणे | अनिष्ठ प्रथेविरुद्ध सामाजिक जागृती (सतीप्रथा, केशवपन, बालविवाह) |
| ६ | प्रगती (रेल्वे, टेलिफोन, कायदे) | |

ब्रिटीश सत्ताधारी पक्ष असल्यामुळे त्यांनी भारतात आपल्या साम्राज्यवादी धोरणांच्या माध्यमातून थोड्याफार प्रमाणात सुधारणा घडवून आणल्या. पण त्या सुधारणा त्यांच्या पक्षाच्या होत्या. याउलट मिशनर्यांनी शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सुधारणाच्या माध्यमातून भारताला बळ प्रदान केले.

### ३. ख्रिस्ती धर्म हा पाश्चात्य धर्म आहे का ?

येशू ख्रिस्ताचा जन्म मध्य आशियात पॅलेस्टाईन या राष्ट्रात झाला. त्यामुळे ख्रिस्ती धर्म हा पश्चिमी धर्म अथवा युरोपियन धर्म नाही अथवा गोऱ्यांचा धर्म नाही. तो आशियाई धर्म आहे. उदा. बौद्ध धर्माचा जन्म भारतात झाला. पण आज संपूर्ण आशिया खंडात त्याने आपली धर्मतत्वे रुजविलेली आहे. अनेक आशियाई राष्ट्रांनी त्याला राजाश्रय दिलेला आहे. त्याचप्रमाणे ख्रिस्ती धर्माला युरोपीय राष्ट्रांनी राजाश्रय दिलेला आहे. त्यामुळे तो युरोपियन धर्म वाटतो. पण त्याचा जन्म आशियात झालेला आहे. "परंपरेनुसार असे मानले जाते कि, येशू ख्रिस्ताचा शिष्य प्रेषित थोमा इ.सन ५२ मध्ये केरळ येथे पोहोचला. तेव्हा त्यानेच ख्रिस्ती धर्म भारतात आणला."[२] ख्रिस्ती धर्माची मुळे भारतात २०२० वर्षापूर्वी रुजून गेलेली आहे आणि आज भारतात भलेही भारतीय लोकसंख्येत ती २.३० टक्के आहे पण त्या टक्क्यांना दोन हजार वर्षाचा वारसा लाभलेला आहे. त्यामुळे ख्रिस्ती धर्म परकीय आहे. हे म्हणणे चुकीचे आहे.

गोवा, वसई, केरळ, चेन्नई आणि भारतातील अनेक जिल्हे आज ख्रिस्ती धर्माचा वारसा घेवून पुढे जात आहे. चर्चचे स्थापत्य शिल्पे, ख्रिस्ती साहित्य, ख्रिस्ती लोकगीते, नाताळचे पर्व, शतकानुशतके चालत आलेल्या ख्रिस्ती धर्माचे आध्यात्मिक आणि भौतिक वारसा हक्कांचे जतन करीत आहे.

भारतीय सांस्कृतिक वारसामध्ये ख्रिश्चन धर्माने लग्नविधी, क्रूसविधी, प्रभूभोजन विधी इत्यादी यांचे स्वतंत्र असे भारतीय परंपरेत स्थान निर्माण केलेले आहे. त्याला युरोपियनच्या नावावरून वेगळे केले जाऊ शकत नाही. त्याचप्रमाणे संविधानकर्त्यांनी राज्यघटनेत धर्मनिरपेक्ष हा शब्द टाकल्यामुळे ख्रिस्ती धर्म इतर धर्माप्रमाणे भारतीय धर्मात समाविष्ठ होतो, कारण सर्व धर्माला राज्यघटनेने समान हक्क दिलेले आहे. मग त्या धर्माचा उदय, विस्तार कोठे झाला याचा काहीच फरक पडत नाही.

### ४. धर्मांतरण म्हणजे देशांतरण होते का ?

धर्मांतरण म्हणजे देशांतरण होते का ? हा विचार फोफावण्यास कारणीभूत घटक म्हणजे ख्रिस्ती धर्म हा आपला भारतीय धर्म नाही. तो पाश्चात्यांचा धर्म आहे. ना.वा.टिळक यांनी जेव्हा ख्रिस्ताचा स्वीकार केला तेव्हा ते बाटले गेले, त्यांनी युरोपियन धर्म स्वीकारला, त्यांनी धर्माच्या माध्यामातून देशांतरण केले, अशी टीका त्यांच्यावर करण्यात आली. पण त्यांनी धर्मांतरण म्हणजे देशांतरण नव्हे या मथळ्याखाली लेख लिहून समाजाला प्रतीउत्तर

दिले. 'माझे धर्मपरिवर्तन नव्हे तर हृदयपरिवर्तन झालेले आहे.' "धर्मांतर ते राष्ट्राला हा विचार मध्ययुगीन असून त्याकाळात धर्म हा त्या राष्ट्राचे राष्ट्रीयत्व मिळविण्याचा मार्ग होता. राष्ट्रीयत्व मिळविल्यामुळेच त्या राष्ट्राचे कायदे कानून लागू होत असत आणि अधिकार प्राप्त होत असत."[३] मध्ययुगीन कालखंडात प्रांतवादी शासन होते. राष्ट्र हि संकल्पना उदयास आलेली नव्हती. पण आता प्रत्येक राष्ट्र सार्वभौम राष्ट्र आहे आणि भारत देखील सार्वभौम राष्ट्रात समाविष्ट होते. त्यामुळे धर्मांतरणामुळे राष्ट्रात अथवा देशांतर होत नाही. आता भारतीय नागरिक म्हणून प्रत्येक जाती-धर्माचे लोक समान आहेत.

**संदर्भसूची:-**


1. असे होते विल्यम कॅरी, डॉ.अरुण गद्रे, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००९, पृ.क्र. २६.
2. पूर्वोक्त भारत घडो, डॉ.बाबू के. वर्गीस,पृ.क्र. २७.
3. धर्मांतर ते राष्ट्रांतर, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१०, पृ.क्र. २.